Umed

New Horizon, Renewed Confidence...

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम

### जुनि जिल्हा परिषद परिसर, वाशिम

दुरध्वनी क्र.:- 07252-235374 E-mail id :- drdawashim@gmail.com

## राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचा गाभा/ध्येये:

- गरीबांची दारिद्र्यातून बाहेर पडण्याची प्रबळ इच्छाशक्ती असते, तशी त्यांच्यात अंगभूत क्षमताही असते. तथापि, ही क्षमता जागृत करण्यासाठी आधारभूत संरचना उभी करण्याची आवश्यकता आहे.

## **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची उद्दीष्टे**

- सर्व गरीबांपर्यंत पोहोचणे.
- गरीबांच्या संस्था स्थापन करणे.
- गरीबांना स्वयंरोजगार व वेतनी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.
- गरीबांना त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत करणे.

## **अभियानाचे आधारस्तंभ :**

- गरीबांच्या संस्थांचे बळकटीकरण
- सामाजिक समावेशन
- आर्थिक समावेशन
- शाश्वत उपजीविका

# अभियान कोणासाठी ?

- मागास प्रवर्गातील महिला,
- वेश्या व्यवसायातील महिला,
- एकल महिला, अपंग,
- अस्वच्छ व्यवसायातील महिला,
- वृध्द,
- वेठबिगार,
- शेतकरी,
- मजूर,
- अल्प व अत्यल्प भु-धारक,
- बेरोजगार युवक-युवती,
- (सर्व गरीबांसाठी)

# NRLM आमच्यासाठी !!!



नियमित बैठका घेणे

(किमान दरमहाला १ बैठक)

नियमित बचत करणे.

शासकीय योजनांमध्ये
सक्रीय सहभाग

नियमित अंतर्गत कर्जाचे
वाटप करणे.



नियमित कर्जाची
परतफेड करणे.

पंचायत राज
संस्थांबरोबर नियमित सहभाग

टाचे लेखे
अद्ययावत ठेवणे

नियमित आरोग्यविषयक काळजी .

शाश्वत उपजीविकेसाठी उपाययोजना

निरंतर शिक्षण व साक्षरता

# दशसूत्री विषयी थोडक्यात ...

- १. नियमित बैठक : शक्यतो गटाची बैठक दर आठवड्याला घेण्यात यावी. असे शक्य नसल्यास दर पंधरा (१५) दिवसांनी बैठक घेण्याविषयी प्रोत्साहित करावे, तसेही न झाल्यास मात्र दर महिन्याला गटाची बैठक होणे आवश्यक आहे. गटाने ठरविलेल्या तारखेला वेगवेगळया सदस्यांच्या घरी बैठक आयोजित करावी.
- २. नियमित बचत : गटाची बैठक दरमहा होत असल्यास ठरलेली रक्कम सदस्याने बैठकीच्या ठिकाणी स्वत: समक्ष जमा करावी. बैठक दर पंधरा (१५) दिवसांनी घेतल्यास बचतीची रक्कम २ टप्यात अर्धी-अर्धी भरावी. बैठक आठवड्याला घेतल्यास महिन्याची रक्कम दर आठवड्याला समान भागात भरावी.
- ३. अंतर्गत कर्ज वितरण : गटाने बचतीची रक्कम बँकेत जमा न ठेवता ती रक्कम गटातील अत्यंत गरजू सदस्यांना त्यांच्या गरजांच्या प्राधान्य क्रमाने विचार-विनिमय करुन अंतर्गत कर्ज म्हणून वितरित करावी.
- ४. कर्जाची नियमित परतफेड : गटाकडून अथवा बँकेकडून घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करणे ही गटाची सामुहीक जबाबदारी आहे व नियमित कर्जफेड करणारा गट पुढे मोठ्या कर्जासाठी अधिक योग्य समजावा.
- ५. गटाचे लेखे अद्ययावत ठेवणे : गटाचे लेखे हे गटाच्या कामकाजाचा आरसा आहे. लेखे रोजच्या-रोज अद्ययावत ठेवणे गटाची मुलभूत जबाबदारी आहे.

## ६) नियमित आरोग्याची काळजी घेणे:

**१०० टक्के कुटुंबे कुपोषण मुक्त व हागणदारी मुक्त करणे,** सदस्य महिलेच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी, तिच्या कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याची काळजी, साधे आजार, दुर्धर आजार, अपघाती आजार, आरोग्य रक्षण निधी, आरोग्य विषये जाणीव जागृती शिबीरे, आरोग्यदिंडी व व्यसनमुक्ती व संदर्भ सेवा इत्यादींबाबत गटाच्या बैठकीत नियमित चर्चा करण्यात यावी. शक्य असल्यास गटाची बैठकीची तारीख/वार निश्चित करून ANM आशा वर्कर MPW किंवा डॉक्टर्स यांना मार्गदर्शनास बोलवावे.

## ७) निरंतर शिक्षण आणि साक्षरता :

**१०० टक्के कुटुंबामधील दाखलपात्र मुलांनी वयोगट निहाय शिक्षण घेणे,** सदस्य महिलेची साक्षरता, कुटुंबातील अन्य व्यक्तींची साक्षरता, वयोगट निहाय मुलांचे शिक्षण व दर्जा, १००% साक्षर व उच्च शिक्षित कुटुंबाचा पंचायत राज संस्थामार्फत गौरव, शाळा व्यवस्थापन समितीच्या सभांना उपस्थिती आणि शाळाबाहय मुलांना शाळेत दाखल करण्यासाठी मदत इत्यादींबाबतीत शाळा व स्वयंसहाय्यता गटांमध्ये समन्वयासाठी चर्चा करण्यात यावी. आवश्यकतेनुसार मुख्याध्यापक/ शिक्षक यांना चर्चेसाठी निमंत्रित करावे.

## ८) पंचायत राज संस्थाबरोबर नियमित सहभाग :

**१०० टक्के वार्डसभा व ग्रामसभेत सक्रीय सहभाग घेणे,** पंचायत राज संस्थाच्या उपक्रमांमध्ये उत्स्फुर्त सहभाग व समुहाच्या उपक्रमांमध्ये पंचायत राज संस्थांचा सहभाग याबाबत गटामध्ये चर्चा करण्यात यावी. आवश्यकतेनुसार पंचायतराज संस्थांचे पदाधिकारी/सदस्य व अधिकारी यांना सभांमध्ये चर्चेसाठी निमंत्रित करावे.

## ९) शासकीय योजनांमध्ये नियमित सहभाग :

**शासनाच्या किमान दोन योजनांमध्ये सक्रीय सहभाग घेणे -** केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमध्ये सक्रीय सहभाग, योजनेचा लाभ उचित लाभार्थ्यांसाठी पोहचविण्यासाठी सहभाग आणि पंचायत राज संस्थांच्या लाभार्थी निवड प्रक्रियेत सहभाग याबाबत सभेमध्ये चर्चा करावी. आवश्यकतेनुसार संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना सभांमध्ये चर्चेसाठी निमंत्रित करावे.

## १०) शाश्वत उपजिवीकेसाठी उपाययोजना :

**१०० टक्के** कुटुंबाची सध्याची उपजिवीका बळकट करण्यासाठी उपाययोजना, कुटुंबातील सदस्यांची गुण-कौशल्ये लक्षात घेवून करावयाच्या उपाययोजना आणि कुटुंबासाठी उपजिवीकेच्या स्त्रोतांची संख्या वाढविण्यासाठी उपाययोजना याबाबत चर्चा करावी.

# भारतातील ग्रामीण कर्ज व्यवस्थेची रचना

भारतीय रिजर्व बॅंक

भारत सरकार

नाबार्ड

ग्रामीण सहकारी संस्था

| | सार्वजनिक बँका (२७) | खाजगी बॅंका (३१) | ग्रामीण क्षेत्रीय बॅंका (८८) |
|---|---|---|---|
| शाखा | ४६११८ | १०८१६ | १४४५६ |
| निम शहरी | १०९०३ | १७६१ | २०३७ |
| ग्रामीण | १९२७५ | ११३८ | १२०६० |
| टक्केवारी | ६५ % | २७ % | ९८ % |

राज्य सह. भॅका – ३०

**जिल्हा मध्य. सह. बँका –३६७**

प्राथमिक कृषी सह. पतसंस्था – १,१२,३०७

**भु विकास बँका – २०**

प्रा. भु विकास बॅका –७३९

**ठेवीधारक व कर्जदार**

**सुक्ष्म वित्त. संस्था**

**स्वयं सहाय्यता गट**

# आर्थिक समावेशन – व्याख्या

- **आर्थिक समावेशन म्हणजे फार मोठया प्रमाणात असणाऱ्या गरिब व कमी उत्पन्न असणाऱ्या व सदयस्थितीत आर्थिक लाभांपासुन वंचित असलेल्या कुटूंबांना परवडेल अश्या किमतीत /मोबदल्यात सर्व बँकिंग सेवांचा / सुविधांचा लाभ देणे.**

- गरिब कुटूंबाचे बँकेत खाते नसते. रोजगार बुडवून लांब असलेल्या दुरच्या गावात बँकेत प्रवासाचा खर्च करून व वेळ खर्च करून वारंवार जाणे आणि बँकांच्या आवश्यक योजनांचा लाभ घेणे त्यांना शक्य नसते.
- तुटपुंज्या उत्पन्नातुन बचत करणे व त्यातुन बँकेत खाते उघडणे, आर्थिक नियोजन करणे त्यांना असक्य असते म्हणुन अश्या वंचितांना बँकेकडून कर्ज आणि इतर सुविधाही मिळत नाहीत.

# आर्थिक लाभातुन वगळण्याची कारणे

- डोंगराळ भागात, कमी वस्तीच्या वाडयांमध्ये राहणे व दळण वळणासाठी रस्ते साधने नसणे.
- गरिबी / कमी उत्पन्न
- सुविधांची माहिती नसणे.
- अशिक्षित असणे.
- सामाजिक बहिष्कृतता.
- बँकेच्या शाखेपासुन जास्त अंतर, शाखेच्या वेळा.
- बँकेच्या कर्जाच्या जाचक अटी आणि कागदपत्रे.
- बँकेच्या गरिबांसाठी अव्यवहार्य योजना.
- भाषेची अडचण, बँकेच्या कर्मचाऱ्यांची वागणुक.
- जास्त खर्च आणि किचकट कार्यपद्धती.

# आर्थिक लाभांपासुन कोण वंचित राहतात?

- लहान आणि अत्यल्प भुधारक शेतकरी
- भुमीहीन शेतमजुर, कुळ, तोंडी कराराने शेती कसणारे, वनपट्टा धारक
- आदिवासी, अनुसुचित जाती /जमाती
- असंघटीत क्षेत्रातील कामगार, कारागीर, मजुर
- स्वयंरोजगारी
- गलीच्छ वस्ती, झोपडपट्टी रहीवासी, निर्वासीत, भटक्या जमाती.
- अल्प संख्यांक, सामाजिक बहिष्कृत गट, पंथ
- जेष्ठ नागरिक, स्त्रीया, विदयार्थी
- अपंग


# वंचितांना कोणत्या सेवा, सुविधा पाहिजेत?

- छोटी कर्जे
- उत्पादक मालमत्ता
- बचतीची व तत्सम खाती
- आरोग्य विमा
- जिवन विमा
- व्यवसाय बंद पडल्यास विमा, कृषी विमा
- लघु उदयोग कर्ज
- क्रेडीट कार्ड
- निवृत्ती लाभ योजना
- तारण कर्ज, गहाण कर्ज
- आर्थिक मार्गदर्शन / सल्ला

# आर्थिक समावेशनात येणाऱ्या बाबी

- बॅंकेत “नो फ्रिल” खाते उघडणे.
- बॅंकेतुन जनरल क्रेडीट कार्ड, किसान क्रेडीट कार्ड मिळणे.
- समुदायांची खाते उघडणे व समुदायाला एकत्रित /वैयक्तिक कर्ज मिळणे. उदा. स्वयं सहाय्यता गट, शेतकरी मंडळ, फेडरेशन, जॉईंट लायाबिलीटी ग्रुपस इ.
- सावकारी कर्जापासुन मुक्तता
- लघु विमा
- आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सेवा उदा. स्वतःच्या गावात पैसे मिळणे, जमा करणे, पैसे पाठविणे इ.
- केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध ३४ योजनांचे पैसे लाभधारकाच्या/ वैयक्तिक बचत खात्यात जमा होणे.

# पर्याय =स्वयं सहाय्यता गट



# अभियानातील प्रमुख घटक

- **१. सध्या अस्तित्वात असलेल्या गटांचे श्रेणीकरण करणे.**
  - अ श्रेणी - नियमित समूह,
  - ब श्रेणी - अनियमित समूह,
  - क श्रेणी - बंद/ निष्क्रिय समूह.
- **२. अ श्रेणी -** नियमित समूहामधून Potential समुदाय संसाधन व्यक्ती (Community Resource Person) व लेखापाल, Book-Keeper ची निवड करणे.
- **३. गरीबांच्या संस्थांची उभारणी व बांधणी :**
  - स्वयंसहाय्यता गट,
  - ग्रामसंघ,
  - क्लस्टर स्तरावरील संघ,
  - तालुकास्तरावरील संघ,
  - जिल्हास्तरावरील संघ

# क्षमता बांधणी व प्रशिक्षण

**१. यंत्रणेची क्षमता बांधणी :** राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय यंत्रणेतील -

- अंमलबजावणी अधिकारी,
- बँक अधिकारी,
- अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी,
- पंचायतराज संस्थांचे प्रतिनिधी.
- Non-I Report (Annx १ to ६).xlsx

**२. समुदायाची क्षमता बांधणी :**

- समुदाय संसाधन व्यक्ती,
- लेखापाल,
- बँक-मित्र,

## वित्तिय अनुदाने :

- **फिरता निधी :** रु. १०,००० ते १५,०००
- **व्याज अनुदान :** केंद्र शासनामार्फत ७% व्याज दर व राज्य शासनामार्फत , ४% व्याजदराने अर्थसहाय्य
- **समुदाय गुंतवणूक निधी :** रु. ५०,००० मर्यादेत
- सुक्ष्म नियोजन आराखडा
- क्लस्टरस्तरावर सुक्ष्म उद्योग निर्मिती
- पायाभूत सुविधा व विपणन
- कौशल्य आणि रोजगार निर्मिती

# सनियंत्रण व मूल्यमापन

## स्वयंसहाय्यता गटाच्या नोंदणीचा उद्देश :

- गटांची अद्ययावत माहिती
- गटांची क्षमता बांधणी करण्यासाठी माहिती
- गटांची बँक जोडणी विषयी माहिती
- अभियानाची दिशा व धोरण ठरविण्यासाठी
- Online data सादर करण्यासाठी
- माहिती मुदतीत व अद्ययावत सादर करण्यासाठी
- गटांना आवश्यक सेवा वेळेवर पुरविण्यासाठी

# M.I.S.

- www.nrlm.govi.in या संकेतस्थळावरील सन २०१७-१८ या वर्षात भरावे लागणाऱ्या Module संबधी माहिती व फायदे

# Training and CB

- तुमच्या जिल्ह्यात घेतल्या जाणार्या सर्व Training संबंधी ची माहिती Online MIS संकेत स्थळावर Training and CB या Module मध्ये भरावी.

- फायदे: त्यामुळे तुमच्या जिल्ह्यातील झालेल्या एकुण Training तसेच कोणत्या प्रकारची Training झाली याची माहिती सोबत त्या Training मध्ये Train झालेल्या व्यक्तींची माहिती आणि Master Trainers ची एकत्रीक माहिती एकत्रित माहिती सर्वांना उपलब्ध होत असते.

# Management Unit Details

- आपल्या जिल्ह्यातील Mission Management कक्ष तसेच तालुक्यातील Mission Management कक्ष संबंधी माहिती Management Unit Details या Module मध्ये अद्यावत करावी.
- फायदे: या मुळे आपल्या जिल्हा तसेच तालुका अभियान कक्षातील प्रमुख तसेच कार्यालायचा पत्ता ई. माहिती एकत्रीक माहिती सर्वांना उपलब्ध होत असते.

# Human Recourse

- आपल्या जिल्हा आणि तालुक्या मधील कार्यरत असणाऱ्या सर्व संबंदितांची माहिती Human Resource मधील Employee Registration या Module मध्ये करावी.
- फायदे: या मुळे तुमच्या जिल्हा तसेच तालुका स्थरावर किती व्यक्ती कार्यरत आहे याची एकत्रित माहिती सर्वांना उपलब्ध होत असते.

# Registration OF Self Help Groups

- आपल्या जिल्ह्यात तयार होणारया गटांची माहिती त्या त्या महिन्यात Register Self Help Group या Module मध्ये गटातील सभासदांच्या माहिती सह अद्यावत करावी.
- फायदे : माहे जून १७ पासून Online MPR मध्ये भरली जात असलेली माहिती या Module मधून घेतली जाणार आहे.
- तसेच गटांच्या सभासदांसह हि माहिती एकत्रित गोळा केली जाते.

# Annual Target

- तुम्हाला राज्य अभियान व्यवस्थापन कक्षा कडून प्राप्त झालेले भौतिक लक्ष या Module मध्ये जिल्हा तसेच तालुका पातळीवर त्रैमासिक भरावे.

# आर्थिक समावेशन



## State Level Interest Subvention scheme: Sumatibai Sukalikar Udyogini Mahila Sakshmikaran Yojana




- NRLM is implementing interest subvention scheme for woman SHGs.
- The interest subvention amount is being disbursed by NRLM through Nodal Bank, i.e. Canara Bank in Category I districts and by MSRLM in Category II districts. After regular repayment, **effective rate of interest for SHG loan is 4% in Category I and 7 % in Category II districts.**
- SSUMSY is applicable to **NRLM compliant woman SHGs** in Maharashtra, supplementary to Interest subvention being given by NRLM, Under this Scheme 4% interest subvention will be given in Category I and 7%in category II districts, resulting **effective 0% rate of interest for loans availed by SHGs subject to regular repayment as per norms of NRLM**.

# दिन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

| Sr no | Name of PIA | Trade | Target | Duration of project | Achievement |
|---|---|---|---|---|---|
| १ | ORION EDUTECH LTD | Hospitality, Retail | १०० | २ Years | ६६ |
| २ | FOCUS EDU CARE PVT LTD | १, Retail-Sales and Marketing | १०५ | २ Years | ५७ |
| ३ | INDUCTUS CONSULTANTS PVT. LMT | Hospitality, Retail, BSPA, Office assistant | ११२ | २ Years | ११२ |
| ४ | NISA Industrial Security Agencies Pvt.LMT. | Security Guard | १५० | २ Years | २३ |
| ५ | RVS Educational trust | Bacic Automotive Service | १०० | २ Years | ० |
| ६ | Keshav Comp.Pvt Lmt. | Computer Operator | १०५ | २ Years | ३० |
| ७ | SAHITHI SYSTEMS PVT.LMT. | Office Asst. Junior Marketing | १०० | २ Years | ० |
| | | Total | ७७२ | | २८८ |

# : उद्देश :

- ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील युवक/ युवतींना कमी कालावधीचे (तीन महिने) प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार देणे.

# : लाभार्थी :

१) ज्या लाभार्थी ची नावे Proct MGNREGA Lifeया यादी मध्ये नाव समाविष्ट आहे .

किंवा

२) ज्या युवकानी MGNREGA अंतर्गत किमान १५ दिवस काम केलेले आहे.(सोबत JOB CARD ची प्रत व हजेरीची पत्रक ची प्रमाणित प्रत जोडणे )

किंवा

३) ज्या युवकांच्या कुटुबांतील महिला NRLM प्रणित बचत गटात सदस्य आहे (यांचे प्रमाणपत्र गटविकास अधीकारी अदा करावयाचे आहे.)

किंवा

४) SECC Survey अंतर्गत वंचीत म्हणुन समाविष्ट करण्यास आलेल्या कुंटुबातील युवक ( यांचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी अदा करावयाचे आहे.)

५) लाभार्थी यांचे वय १८ ते ३५ च्या दरम्याण असावे.












DDU-GKY
Deen Dayal Upadhyaya
Grameen Kaushalya Yojana
Empowering India • Powering the World












DDU-GKY
Deen Dayal Upadhyaya
Grameen Kaushalya Yojana
Empowering India • Powering the World








# Thank you